नियमित फौ. ख. क्र. ३६/२०१९
सरकार -वि.- सुरेश शिंदे
नि.क्र. ३९.

सरकार तर्फे साक्षीदार क्र.३ यांची जबानी

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

माझे नाव - नैना राजेंद्र शिंदे,
वय ४० वर्षे, व्यवसाय – घर काम,
राहणार – उमरेड, ता. उमरेड, जि. नागपूर.

**<u>सरतपासणी-सहायक सरकारी अभियोक्ता श्री. व्ही. यू. मिरचे यांचे मार्फत</u>**

१. मी आरोपींना ओळखते ते आज कोर्टात हजर आहेत. घटना दि.०४.११.२०१९ रोजी दुपारी १.०० वा. घडली होती. त्यादिवशी ११.०० वा. फोन आला की, तुमच्या शेताच्या धुऱ्यावर जे पाईप व इंजन आहे त्याकरिता राजेंद्र शिंदे यांना शेतावर पाठवा. त्यानंतर मी व माझे पती राजेंद्र शिंदे दोघेही शेतावर गेलो. त्यावेळी शेतावर माझी जाऊ उज्वला शिंदे व भासरा सुरेश शिंदे हजर होते. ते आम्हाला शिवीगाळ करुन बोलत होते. त्यानंतर दोन्ही भावांमध्ये भांडण सुरु झाले. मी त्यावेळी वाचविण्याकरिता गेली असता सुरेश शिंदे यांनी माझ्या पतीच्या पायावर बंडीची लाकडी उभारी मारली व नंतर त्यांनी माझ्या डाव्यावर तीच उभारी मारली त्यामुळे माझ्या हातातून रक्त निघू लागले. त्यानंतर मी व माझे पती पोलीस चौकी नांद येथे गेलो. तेथे पोलिसांनी आम्हाला उपचाराकरिता पाठविले. माझी सालेभट्टी येथे सव्वा चार एकर शेती आहे. घटनेच्यावेळी ती शेती आम्हीच वाहत होतो. आता मला दाखविलेली फिर्याद तीच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.४०** देण्यात येते. आता मला छापील प्रथम खबर अहवाल दाखविण्यात आला. तो तोच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.४१** देण्यात येते. ज्या उभारीने मला मारले होते ती मला दाखविलयास मी ओळखू शकतो. आता साक्षीदाराला गुन्हातील जप्त लोखंडी पाईप दाखविण्यात आला तो पाईप तो नाही. पोलीस दुसऱ्या दिवशी घटनास्थळी चौकशीला गेले होते.

सरतपास संपला.

**<u>उलट तपास आरोपी तर्फे त्यांचे वकील श्री नागोशे यांचे मार्फत</u>**

२. माझ्या सासऱ्याला चार मुले आहेत. त्यांची नावे रमेश गुलाबराव शिंदे, सुरेश गुलाबराव शिंदे, अशोक गुलाबराव शिंदे व राजेंद्र गुलाबराव शिंदे असे आहे. माझ्या सासऱ्यांच्या नावे साडे अकरा ऐकर शेती आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या सासऱ्यांनी त्या जमिनीचे मृत्यू पत्र करुन दिले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्या मृत्यू पत्रान्वये माझे पती व अशोक यांना जमिन देण्यात आली होती. हे म्हणणे खरे आहे की, सुरेश शिंदे यांना कुठलीही जमिन देण्यात आली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, माझे सासरे मरण पावल्यानंतर आम्ही फेरफाराकरिता अर्ज केला होता. हे मला माहीत नाही की, त्या फेरफारावर आरोपीने हरकत घेतली होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने हरकत घेतल्यामुळे आमची फेरफार बऱ्याचवेळ झाली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, ते हरकत घेतल्यामुळे माझे पती आरोपीवर चिडले होते. हे मला माहीत नाही की, सुरेश शिंदे यांनी त्यांच्या पत्नीच्या नावे सन २००४ मध्ये जनार्धन मेश्राम यांच्याकडून दोन एकर शेती घेतली होती. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या शेतीमध्ये व उज्वला शिंदे यांनी घेतलेल्या शेतीमध्ये ८० फुटाचा उत्तर दक्षीण उमरेड भिसी रोड आहे. हे म्हणणे खरे आहे की, आमची शेती रस्त्याच्या पश्चिमेला आहे व आरोपीची शेती पूर्वेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींना त्यांच्या शेतीची वाहीजुपी करण्याकरिता आमच्या शेतातून जावे लागत नाही व आम्हालांही त्यांच्या शेतातून जावे लागत नाही. हे म्हणणे खरे नाही की, तथाकथीत घटनेच्या दिवशी आम्ही आरोपीच्या शेतात गेलो होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी मी आरोपी सुरेश याची कॉलर पकडली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी माझ्या पतीने आरोपी सुरेश याला जप्त केलेल्या लोखंडी रॉडने मारहाण केली होती. सदर जप्त केलेला रॉड उलट तपासात दाखविल्यामुळे त्यास **आर्टिकल 'अ'** देण्यात येते.

३. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी माझा भाऊ पवन जगताप व त्यांच्यासोबत एक व्यक्ती शेतात आले होते. हे म्हणणे खरे नाही की, पवन जगताप याने उज्वला शिंदे हिचा ब्लाऊज फाडला होता. हे म्हणणे खरे आहे की, पवन जगतापवर या न्यायालयात केस चालू आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने फेरफारावर हरकत घेतल्यामुळे चिडून जाऊन आम्ही आरोपीच्या शेतावर जाऊन त्याला मारहाण केली. हे म्हणणे खरे नाही

की,  आरोपींना मारहाण केल्याचा आरोप आमच्यावर येऊ नये म्हणून खोटी फिर्याद दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, आम्हाला विश्वास मांढरे याने फोन केला नव्हता व पाईप बद्दा माहिती दिली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्यावेळी आमच्याकडे बैल बंडी नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, आमच्याकडे बैल बंडी होती हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने मला उभारीने मारले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे माझ्या पतीला व मला जखमा झाल्या हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पतीवर आरोप लागू नये म्हणून मला पुढे करुन खोटी फिर्याद दिली. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास संपला.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,
माझे समक्ष,

दिनांक - १९.०८.२०२५

स्वा/-
(एस. जे. लाड)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
भिवापूर.